# मराठी अभ्यास केंद्र

श्वास मराठीचा... ध्यास महाराष्ट्राचा

(नोंदणी क्रमांक- महा/६९४/०९/ठाणे, विश्वस्त संस्था नोंदणी क्रमांक :एफ/१८५०१/ठाणे),

संपर्क – ७२०८१ ८६३५३, ई.पत्ता - marathipalaksammelan2017@gmail.com

# कार्यशाळेचे उद्दिष्ट



संगणकाला कोणतीही मानवी भाषा कळत नाही

संगणकाला केवळ ० व १ ची Binary (द्विपद) भाषा कळते.

संगणकीय क्षेत्रात भाषांचे प्रमाणीकरण करण्यासाठी

१९९१ साली ना नफा ना तोटा या तत्त्वावर युनिकोड कन्सॉर्शिअम या संस्थेची स्थापना करण्यात आली.

भाषा वापरण्याची सोय (Input Language) एकसारखी असावी या उद्दिष्टाने

# युनिकोड कन्सॉर्शिअमचे सदस्य

## बहुराष्ट्रीय कंपन्या आणि देशांप्रमाणेच तमीळनाडू राज्य शासन तसेच बर्कलेसारखे विद्यापीठ कन्सॉर्शिअमचे सदस्य आहे हे लक्षणीय



## युनिकोड म्हणजे काय?

कोणतीही ऑपरेटिंग सिस्टीम असो किंवा प्रोग्रॅम


लोकांच्या स्वभाषेतून संगणकीय तंत्रज्ञानाचा वापर

प्रत्येक भाषेचं स्वतंत्र एकसमान मानक

# संगणकीय भाषेचा वापर म्हणजे काय?



- संगणक, मोबाईल, स्मार्टफोन, टॅब इ. उपकरणांचं स्थानिकीकरण
- वर्ड, एक्सेल, पॉवरपॉईंट, आणि इतर संगणकीय प्रोग्रॅमचा वापर
- संकेतस्थळं, ब्लॉग, इमेल, सोशल साईट्स, इंटरनेटवरील शोध
- स्मार्टफोनमधील विविध ॲप तसेच मजकूरविषयक वापर


युनिकोड असतं कुठे ?
सुरु कसं करायचं ?
वापर कसा करायचा ?

# युनिकोड असतं कुठे?



युनिकोड हे वेगळं सॉफ्टवेअर नाही.

ते संगणकाच्या कार्यप्रणालीतच (Operating System) असतं

फक्त भाषा सुरु करायची असते.

# सुरु कसं करायचं?



Start

मधून

Control Panel

मध्ये जा

Regional and Language Options

चा पर्याय निवडा

नव्या चौकटीतील

Languages

चा पर्याय निवडा

☑ Install files for complex script and right-to-left languages (including Thai)

या चौकटीत टिक करा

नवी चौकट उघडेल. तुमच्या Windows XP च्या सीडीची मागणी करेल. त्यावरील Ok चे बटण दाबा.




पुन्हा नवी चौकट उघडेल तुमच्या Windows XP ची सीडी आणि त्यातील आवश्यक i386 च्या फाईलची मागणी करेल.




सीडी ड्राईव्हमध्ये Windows XP ची सी.डी. टाका आणि Ok चे बटण दाबा.

Windows XP सी.डी. नसल्यास तुम्ही संगणकास i386 फाईल्सचे फोल्डर असलेल्या पेनड्राईव्ह मधून घेण्यास सुचवू शकता

फाईल्स घेऊन झाल्यावर संगणक बंद करून पुन्हा सुरु करण्याची सूचना मिळेल. त्यानुसार तसे करा. संगणक पुन्हा सुरु झाल्यावर **Control Panel** मधून **Regional and Language Option** मध्ये जा. त्यातील **Languages** पर्याय निवडा.




आता Details या बटणावर क्लिक करा


Text Services and Input Languages ही नवी चौकट उघडेल..


त्यातील




Setting च्या पर्यायात Add… च्या बटणावर क्लिक करा







यादीतून **Marathi** भाषेचा पर्याय निवडा.

**Marathi** (मराठी) हा कळफलकाचा (**Keyboard**) पर्याय निवडा.
त्यानंतर **Ok** चे बटण दाबा.




आता तुम्हाला चौकटीमध्ये **EN English (United State)** च्या खाली **MA Marathi** या नावाने मराठी भाषा सुरु झाली असल्याचे दिसेल. **Apply** आणि नंतर **Ok** चे बटण दाबा.




भाषा सुरु झाली आहे.

## Windows Vista   Windows 7

मधून

Control Panel मध्ये जा

Regional and Language Options

चा पर्याय निवडा

नव्या चौकटीत

Keyboards and Languages


चा पर्याय निवडा

त्यातील


Change keyboards...

या बटणावर क्लिक करा


Text Services and Input Languages ही नवी चौकट उघडेल.


त्यातील General च्या पर्यायात जाऊन च्या 

बटणावर क्लिक करा



Windows Vista Windows 7




**Add Input Languages चौकट उघडेल. भाषांच्या यादीतून Marathi भाषेच्या पर्यायासमोर क्लिक करा.**

**Marathi या पर्यायाशेजारी + च्या खुणावर क्लिक करा. त्यानंतर Keyboard या पर्यायाशेजारी असलेल्या + च्या खुणावर क्लिक करा.**


**Devnagari - INSCRIPT, Marathi, US आणि Show More... या चार पर्यायांपैकी Marathi च्या पर्यायासमोर टिक करून OK चे बटण दाबा.**

**चौकटीमध्ये EN English (United State) च्या खाली MA Marathi भाषा दिसेल. आता Apply आणि नंतर Ok चे बटण दाबा.**


**मराठी**

**भाषा सुरु झाली आहे.**

# Windows 8 Windows 10




मध्ये जा




चा पर्याय निवडा

त्यातील





चा पर्याय निवडा

Windows 8 Windows 10

**Change Your Language preferences**
**ही चौकट उघडेल.**


त्यातील




बटणावर क्लिक करा



Windows 8 Windows 10




नव्याने उघडलेल्या चौकटीत मराठी **Marathi** हा पर्याय निवडा.

किंवा पर्याय निवडून आणि चौकटीच्या तळाशी असलेले **Add** चे बटण दाबा.

Windows 8 Windows 10

चौकटीमध्ये **English (United States)** च्या खाली मराठी या नावाने मराठी भाषा सुरु झाली असल्याचे दिसेल.

इथे संगणक स्वत:च **Marathi** हा कळफलक निवडेल.

मराठी भाषा सुरु झाली आहे.



**Windows XP, Vista, आणि 7 मध्ये तळपट्टीवर भाषांची खूण अशी दिसेल**




**Windows 8 आणि 10 मध्येध्ये तळपट्टीवर भाषांची खूण अशी दिसेल**




**एका भाषेतून दुसऱ्या भाषेत जाण्यासाठी माऊसद्वारे भाषा निवडा**
**किंवा + ही बटणे एकत्रित दाबा**





# इन्स्क्रप्ट कळफलकाची रचना

# इन्स्क्रिप्ट कळफलक






**Standard Keyboard Layout**

**चार ओळींमध्ये एकूण ४७ बटणांचा वापर**

**दोन भागांत विभागणी**

**डाव्या बाजूला स्वर आणि उजव्या बाजूला व्यंजनं**



सर्वात वरच्या आडव्या ओळीमध्ये ऑ आणि १ अंकाच्या बटणावर ॲ हे नव्याने स्वीकारलेले स्वर आणि २ अंकाच्या बटणावर ◌ॅ हे स्वरचिन्ह.

मधल्या आडव्या २ ओळींमध्ये अ ते औ हे १० स्वर

अं आणि अः साठी स्वतंत्र बटणं नाहीत. स्वरचिन्हांच्या उपयोगाने हे स्वर टाईप करता येतात

सर्वात खालील आडव्या ओळीत ◌ं (अनुस्वार) आणि ◌ँ (अर्धचंद्रबिंदू) ही अनुनासिके. सर्वात वरच्या आडव्या ओळीत ◌ः हे स्वरचिन्ह




मधल्या आडव्या २ ओळींमध्ये २४ व्यंजनं

सर्वात खालील आडव्या ओळीत म, ण, न, व, ल, ळ, स, श, ष आणि य ही १० व्यंजनं

सर्वात वरील आडव्या ओळीत क्ष हे व्यंजन आणि ज्ञ, त्र, श्र, ऋ ही अक्षरे व ृ हे चिन्ह

सर्वात वरील आडव्या ओळीत १ ते १० हे देवनागरी लिपीतील अंक




सर्वात खालील आडव्या ओळीत . (पूर्णविराम) आणि , (स्वल्पविराम) ही दोन विराम चिन्हे.

सर्वात वरील आडव्या ओळीत () हे कंस आणि - हे चिन्ह

इतर सर्व विराम चिन्हे आणि गणितीय प्रक्रियेतील चिन्हांकरता इंग्रजी भाषेचा वापर करावा लागतो.



## इन्स्क्रिप्ट कळफलकाचा वापर करून कसं लिहायचं ?

# मराठीतून लिहिताना हे लक्षात ठेवा

- वर्णमाला (स्वर आणि व्यंजने), विशेष अक्षरे (संयुक्त व्यंजने) आणि अंक
- बाराखडी (व्यंजनांना स्वरांची जोड)
- जोडाक्षरे (दोन वा अधिक व्यंजनांची जोड)
- अनुनासिके आणि अर्धचंद्रबिंदू
- विराम चिन्हे आणि इतर

# वर्णमाला

कळफलकाची रचना महत्त्वाची

एका बटणावर दोन अक्षरे एक अक्षर वर आणि एक अक्षर खाली

देवनागरीतील सर्व अंक बटणावरील खालची अक्षरे आहेत.

# संपूर्ण वर्णमाला लिहिण्याचा सोपा नियम

बटणावरील
खालच्या
अक्षरासाठी
बटण थेट दाबावे

बटणावरील वरचे
अक्षर लिहिण्यासाठी
Shift + त्या
अक्षराचे बटण दाबावे


क =
क या
अक्षराचे
बटण




१ =
१ या
अंकाचे
बटण





ख =
Shift + ख
या अक्षराचे
बटण





+




अ =
Shift + अ
या स्वराचे
बटण




+



# लक्षात असू द्या

## सर्वात वरील आडव्या ओळीत क्ष व ज्ञ ही व्यंजने आणि श्र व ऋ ही विशेष अक्षरे (संयुक्त व्यंजने) आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क्ष | = | Shift + क्ष चे बटण | ⇧ Shift | + | & क्ष 7 |
| ज्ञ | = | Shift + ज्ञ चे बटण | ⇧ Shift | + | % ज्ञ 5 |
| श्र | = | Shift + श्र चे बटण | ⇧ Shift | + | % ज्ञ 5 |
| ऋ | = | Shift + ऋ चे बटण | ⇧ Shift | + | + ॠ = ृ |


सर्व स्वर हे त्या त्या बटणातील वरचे अक्षर आहे.

अ = Shift + अ चे बटण




अं, अः, आणि ॲ हे स्वर लिहिण्याची पद्धत थोडी निराळी आहे.

अं = Shift + अ + ं (अनुस्वार)




अः = Shift + अ + ः (विसर्ग)




ॲ = Shift + ॲ




ॲ = Shift + अ + Shift + ॅ स्वरचिन्ह



# बाराखडी

बाराखडी म्हणजे व्यंजनाला स्वर जोडून तयार झालेले अक्षर

व्यंजनाला स्वर जोडणे म्हणजेच स्वरचिन्हांचा वापर करणे

स्वरचिन्हे ही स्वरांच्याच बटणांवर असलेली खालची अक्षरे आहेत

# बाराखडी लिहिण्याचा सोपा नियम

**व्यंजन**

**+**

**स्वरचिन्ह**

# प्रत्येक स्वराचे स्वरचिन्ह

अ = ◌्

आ = ◌ा

इ = ि◌

ई = ◌ी

उ = ◌ु

ऊ = ◌ू

ए = ◌े

ऐ = ◌ै

ओ = ◌ो

औ = ◌ौ

अं = ◌ं

अः = ◌ः

अॅ = ◌ॅ

ऑ = ◌ॉ

| | | | |
|---|---|---|---|
| का | = | क + ◌ा | Kख क + Eआ ा |
| खा | = | Shift + ख + ◌ा | Shift + Kख क + Eआ ा |
| कं | = | क + ◌ं (अनुस्वार) | Kख क + Xँ ं |
| क: | = | क + Shift + ◌ः | Kख क + Shift + ¯ः _ |
| कॅ | = | क + Shift + ◌ॅ | Kख क + Shift + @ॅ 2 |
| डॉ | = | ड + ◌ॉ | { ढ [ ड + \| ऑ \ ॉ |

# जोडाक्षरे

जोडाक्षर म्हणजे एका व्यंजनाला दुसरे व्यंजन जोडून नवे संयुक्त व्यंजन तयार करणे

जोडाक्षरे ही दोन किंवा तीन व्यंजनांचीही असू शकतात.

# जोडाक्षरे लिहिण्याचा सोपा नियम

जोडाक्षरातील
व्यंजनाचा क्रम
महत्त्वाचा
(अक्षराची फोड)

प्रत्येक व्यंजनात
अ हा स्वर
मुळातच असतो

पहिल्या
व्यंजनातील अ
हा स्वर काढून
नंतर त्यास नवे
व्यंजन जोडणे

पहिल्या
व्यंजनास हलन्त
देणे किंवा त्याचा
पाय मोडणे

पहिल्या व्यंजनाचे बटण
+
◌् (हलन्त/पाय मोडणे)
+
दुसऱ्या व्यंजनाचे बटण

क्य

=

क + ◌् + य




ख्य

=

Shift + ख + ◌् + य




ष्ट्र

=

Shift + ष + ◌् + ट + ◌् + र



# र ची जोडाक्षरे

ष्ट्र चे उदाहरण याआधीच दिले आहे.


र्य = र + ◌् + य




क्र = क + ◌् + र




त्र = त + ◌् + र




सर्वात वरच्या ओळीत त्र साठी स्वतंत्र बटण आहे. त्याद्वारे त्र लिहिण्यासाठी **Shift + त्र** चे बटण दाबावे.

# आडव्या रेघेच्या र ची जोडाक्षरे ( वाऱ्या, साऱ्या, ऱ्हस्व, ऱ्हास, इ. )

यासाठी र च्या बटणावर दोन प्रकारचे र दिलेले आहेत.

एक नेहमीचा र आणि दुसरा नुक्ता असलेला ऱ

नुक्ता असलेल्या ऱ चा उपयोग आडव्या रेघेच्या र च्या जोडाक्षरांसाठी केला जातो

ऱ्य = Shift + ऱ + ़ + य




ऱ्ह = Shift + ऱ + ़ + ह




लक्षात घ्या, र आणि ऱ मधील नेमकी निवड चुकली तर चुकीचे जोडाक्षर तयार होईल

# ऋ ची जोडाक्षरे ( हृदय, कृती )

यासाठी पाय मोडायची आवश्यकता नाही

ऋ मध्ये अ हा स्वर नसून उकाराचा स्वर आहे

ऋ च्या जोडाक्षरासाठी सुरवातीच्या व्यंजनानंतर ऋ चे बटण थेट दाबावे

**हृ** = ह + ऋ




**कृ** = क + ऋ



# हलन्त दिसणारी (पाय मोडलेले तसेच दिसणे) जोडाक्षरे
## उदा. वाङ्मय

हलन्त दिल्यानंतर (पाय मोडणे) पुढचे अक्षर जोडले जावे

जोडाक्षरातही हलन्ताचे चिन्ह आणी जोडलेली दोन्ही व्यंजने तशीच दिसावीत

यासाठीचा नियम
हलन्त दिल्यानंतर
Control
+
Shift
+
१
ही बटणे एकत्रित दाबावीत

# हलन्त दिसरणारी (पाय मोडलेले तसेच दिसणे) जोडाक्षरे

## उदा. वाङ्मय

**जोडाक्षराच्या सामान्य नियमाप्रमाणे**

ङ्‌म

=

**Shift + ङ + ◌् + म = ङ्म**

=

ङ्म

# हलन्त दिसरणारी (पाय मोडलेले तसेच दिसणे) जोडाक्षरे


## उदा. वाङ्मय

**Control + Shift + १ चा एकत्रित वापर केल्यास**

ङ्‌म

=

**Shift + ङ + ◌् + (Control + Shift + १एकत्रित) + म**




=

ङ्‌म

# माहितीसाठी

**क्ष व ज्ञ ही व्यंजने आणि श्र हे विशेष अक्षर म्हणजे संयुक्त व्यंजनेच  आहेत**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्ष** | = | **क + ष** | = | **क + ◌् + Shift + ष** |
| **ज्ञ** | = | **ज + ञ** | = | **ज + ◌् + Shift + ञ** |
| **श्र** | = | **श + र** | = | **श + ◌् + र** |

# जोडाक्षरांची बाराखडी

तयार केलेल्या
नव्या संयुक्त
व्यंजनाला स्वर
जोडून तयार
झालेले अक्षर

यासाठी
बाराखडी
लिहिण्याचाच
नियम वापरायचा
आहे

**ख्या**

=

**Shift + ख + ◌् + य + ◌ा**



# अनुनासिक स्वर
# आणि
# अर्धचंद्रबिंदू

ं (अनुस्वार) हे अनुनासिक आणि ँ (अर्धचंद्रबिंदू)

ं (अनुस्वार) हे अनुनासिक बटणावरील खालचे अक्षर

ँ (अर्धचंद्रबिंदू) बटणावरील वरचे अक्षर

ं (अनुस्वार) हे अनुनासिक कसे वापारायचे हे बाराखडीत पाहिले आहे.


# अर्धचंद्रबिंदूचा वापर

बाराखडीच्या नियमाप्रमाणेच अर्धचंद्रबिंदूचा वापर केला जातो

बँ

=

ब + Shift + ◌ँ




=

बँ

# ऑ च्या उच्चारातील अर्धचंद्रबिंदूचा वापर

**सामान्य नियमाप्रमाणे**

बॉँ = ब + ॉ + Shift + ँ = बॉँ




**अनुस्वाराचा वापर करून**

बॉँ = ब + ॉ + ं = बॉं




**दृश्य स्वरूपाचा विचार करता ही दोन्ही अक्षरे चुकीची आहेत.**

# ऑ च्या उच्चारातील अर्धचंद्रबिंदूचा वापर

**ही पद्धत वापरा**

**बॉँ**

=

**ब + ◌ा + Shift + ◌ँ**




=

**बॉँ**

सर्वात खालील आडव्या ओळीत . (पूर्णविराम) आणि , (स्वल्पविराम) ही दोन व्याकरणाची चिन्हे

सर्वात वरील आडव्या ओळीत () हे कंस आणि - चिन्ह

इतर सर्व व्याकरणाची चिन्हे आणि गणितीय चिन्हांकरता इंग्रजी भाषेचा वापर करावा लागतो

स्टँडर्ड कीबोर्ड लेआऊटच्या उजव्या बाजूस गणितीय प्रक्रियांसाठीचा अंकांचा विभाग आपण मराठी भाषेत असतानाही वापरू शकतो.

## व्याकरणाची चिन्हे
## ( विराम चिन्हे आणि इतर )


स्मार्टफोनमध्ये युनिकोड
कुठे असतं?
कसं सुरु करायचं ?
कसा वापर करायचा ?

# स्मार्टफोनमध्ये युनिकोड असतं कुठे ?

Android, iOS आणि Windows या कार्यप्रणाली

सर्व कार्यप्रणालींत युनिकोड तत्त्वाचेच पालन

सर्व मजकूर युनिकोडाधारित


भाषा सुरु करण्याऐवजी कळफलकाचे App महत्त्वाचे

Android फोन करता सीडॅकचे ॲप

iPhone मध्येही इन्स्क्रिप्ट मराठी

Windows फोन मध्ये इन्स्क्रिप्टची सोय नाही

**Android कार्यप्रणालीवर चालणाऱ्या फोनमध्ये सीडॅकने तयार केलेलेच ॲप वापरावे. तेच परिपूर्ण आहे. Android version 4.1 आणि त्यापुढील version मध्ये हे काम करते.**




**http://cdac.in वर जा**

**Downloads मध्ये जा**




**Multilingual Tools च्या चौकटीतील Unified Virtual Keyboard for Indian Languages on Android Platform या दुव्यावर (Link) क्लिक करा.**


ॲप डाऊनलोड करण्याची प्रक्रिया मोबाईल किंवा संगणक दोन्हींवर करू शकता


संगणकावर डाऊनलोड झालेली CDACGISTUnifiedKeyboardIL.apk ही फाईल ॲप मोबाईलवर ईटपाल (Email) / यु.एस.बी / किंवा ब्लूटुथच्या माध्यमातून घेऊ शकता.


हे ॲप इतरांच्या Android मोबाईलमध्ये असल्यासही ते तुम्ही ब्लूटुथ किंवा Sharing शी संबंधित इतर ॲपद्वारे घेऊ शकता.


डाऊनलोड झालेली
**CDACGISTUnifiedKeyboardIL.apk**
ही फाईल उघडा

अॅप इन्स्टॉल करण्याविषयी विचारले जाईल.
**Install** चा पर्याय निवडा.











App Installed असा संदेश दिसल्यावर Open चा पर्याय निवडा


नव्या चौकटीत नियम अटी स्वीकारण्याबद्दल विचारणा होईल. चौकटीत टिक करून त्या मान्य करा आणि OK चे बटण दाबा.


**शेजारील चित्राप्रमाणे त्या त्या मोबाईल फोनमध्ये काही प्रक्रिया पार पाडण्याची सूचना मिळेल.**


**OK म्हणून या प्रक्रिया पार पाडा**







**Language and Input च्या पर्यायातील C-DAC, GIST Indian Language Keyboard हा पर्याय निवडा**


**शेजारील सेटींगच्या खुणेवर क्लिक करून**




**Keyboard Settings मध्ये जा**

**Input Language च्या यादीवर क्लिक करून यादीतील मराठी भाषेचा पर्याय निवडा**


कोणत्याही लिहिण्याजोग्या ॲपमध्ये (मेसेज, मेल, व्हाट्सअप ई.) गेल्यावर मोबाईल स्क्रीनच्या वरच्या बाजूस notification च्या जागी कळफलकाची खूण दिसेल. त्या  notification स्क्रीन वर जा




Choose Input Method च्या यादीतून
C-DAC, GIST Indian Language Keyboard
हा पर्याय निवडा




Android Keyboard वर डाव्या बाजूस पृथ्वीच्या आकाराची खुण दिसेल. त्यावर क्लिक करा.




इन्स्क्रिप्ट मराठीचा कळफलक सुरु होईल.



# Android मधील इन्स्क्रिप्ट कळफलकाची रचना आणि वापर













कळफलक चार पदरी आहे

लिहिण्याची पद्धतही आपण याआधी शिकलो तीच




थेट बटणांचा
वापर म्हणजेच
Shift शिवाय




डाव्या बाजूचे वरच्या दिशेने जाणाऱ्या बाणाचे बटण म्हणजे **Shift** बटण

**Shift** च्या वापराने लिहिता येणारी अक्षरे




अंकांसाठी आणि व्याकरणविषयक चिन्हांसाठी

?१२ असे लिहिलेले बटण अंक, व्याकरण आणि गणितीय चिन्हांसाठी




उर्वरित
चिन्हांसाठी

?12 लिहिलेले
बटण उर्वरित
चिन्हांसाठी




**abc लिहिलेल्या बटणाने इंग्रजी आणि मराठी अशी भाषा बदलता येते.**

# iPhone

**iOS 7.0. (iPhone) कार्यप्रणाली पासून iPhone मध्ये इन्स्क्रिप्ट मराठी कळफलकाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.**

# iPhone

**Settings**
च्या पर्यायात जाऊन
General
चा पर्याय निवडा

Keyboard
हा पर्याय निवडा

Keyboards
हा पर्याय निवडा

Add New Keyboard...
हा पर्याय निवडा

भाषांच्या यादीतून
Marathi
हा पर्याय निवडा

# iPhone








फोनवर सुरु असलेल्या भाषांच्या यादीत मराठी दिसेल




कोणत्याही लिहिण्याच्या ॲपमधील कळफलकावरील पृथ्वीच्या चिन्हाचे बटण दाबा.


यादीतून मराठीचा पर्याय निवडा


# iPhone




इन्स्क्रिप्ट मराठी कळफलक सुरु झाला आहे.








**कळफलक चार पदरी आहे**


**अक्षरांच्या जागांच्या दृष्टीने अगदी जुजबी बदल**

**लिहिण्याची पद्धतही आपण याआधी शिकलो तीच**




थेट बटणांचा वापर म्हणजेच **Shift** शिवाय

◌ॅ हे स्वरचिन्ह खालच्या ओळीत





**Shift च्या वापराने लिहिता येणारी अक्षरे**

**डाव्या बाजूचे बाणाचे बटण म्हणजे Shift**

**आडवा र, अॅ, ज्ञ व क्ष खालच्या ओळीत**


**ृ हे चिन्ह मधल्या ओळीत**

**१२३, अंक आणि चिन्हांसाठीचे बटण**




अंकासाठी आणि
व्याकरणविषयक
चिन्हांसाठी

#+= लिहिलेले
बटण दाबल्यास
उर्वरित चिन्हे




उर्वरित चिन्हांसाठी

पुन्हा अक्षरांवर येण्याकरता क लिहिलेले बटण




# इन्स्क्रिप्ट कळफलकच का?

# इन्स्क्रिप्ट कळफलकाशिवाय अन्य कळफलक का वापरू नयेत?
## विशेषतः ट्रान्सलिटरेशन (जसे गुगल इ.)

- मराठी लिहिण्यासाठी इंग्रजी येण्याची अट
- लक्षात घ्या, आपल्या भाषेला स्वतंत्र लिपी आहे.
- देवनागरी ऐवजी रोमन लिपीत शब्दरचना (स्पेलिंग)
- अनिश्चित शब्दरचनेमुळे सतत योग्य शब्दांची निवड करावी लागते
- नेमक्या शब्दांचा अभाव. त्यामुळे चुकीच्या शब्दांची निवड
- वेगाने टंकलेखन करता येत नाही

# ट्रान्सलिटरेशन कळफलकामुळे येणाऱ्या अडचणी













ॲनी

इन्स्क्रिप्ट

कलमनामा

ऱ्हस्व


वाङ्मय.


मात्र हे सारे शब्द इनस्क्रिप्ट कळफलकाच्या वापराने सहज लिहिता येतात


# याकरिता वापरावा इनस्क्रिप्ट कळफळक!

- मराठीसाठी देवनागरी लिपीचाच वापर
- शास्त्रोक्त रचना
- भाषा आणि व्याकरणाचा विचार
- अक्षरांच्या दृश्य स्वरूपाचा विचार
- शब्दांच्या वापराच्या प्रमाणाचा विचार
- नवे शब्द निर्माण करू शकतो
- वेगाने टंकन करण्यासाठी उपयोगी
- ही सोय अन्य कळफलकांत नाही
- उच्चाराप्रमाणे शब्द लिहू शकतो

# आता








वर्ड, स्प्रेडशीट, सादरीकरणं मराठीतून करा


फाईल्स आणि फोल्डरला मराठीतून नावं द्या

# आता










इंटरनेटवर मराठीतून शोध घ्या

सोशल मिडियाचा वापर मराठीतून करा

मराठीतून ईमेल करा

# आता













मराठीतून संकेतस्थळे आणि ब्लॉग तयार करा

इंटरनेटवर मराठीतून माहितीसाठा (Database) निर्माण करा

# आता





**स्मार्टफोनमध्ये गप्पा आणि संदेशासाठी मराठी वापर**

**फोनमध्ये मोबाईल क्र. आणि इतर माहिती मराठीतून लिहा**


आता तुम्ही संगणकावर
मराठीतून कोणतंही अक्षर
अक्षरांतून शब्द
शब्दांतून वाक्य
लिहिण्यास शिकला
आहात
धन्यवाद..!!